पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११ ०१८.
(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल)
सूचना

क्रमांकः- नरवि/कावि/२३६/ २०१८.

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड शहराची सूधारित विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस-१८९३/१२७६/ सीआर -१७४/९३/नवि-१३, दिः- १८/९/१९९५ अन्वये मंजूर झाली असून ती दिः- २/११/१९९५ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली)

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत मौजे पिंपळे निलख येथील स.नं. ६४ व ६५ मधील सुमारे ४.५० हेक्टर क्षेत्र आरक्षण क्र. ३७४ अन्वये "उद्यान" या प्रयोजनासाठी आरक्षित आहे. (यापुढे "उक्त जमीन" म्हणून संबोधिलेली)

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मा. महापालिका सभा ठराव क्र. २३९, दिः- २०/०७/२०१८ अन्वये उक्त विकास योजनेतील उक्त जमीनीतील "उद्यान" या आरक्षणाच्या मनपाच्या ताब्यातील ४.०० हेक्टर क्षेत्रामधील काही क्षेत्रामध्ये सध्या मैलाशुध्दीकरण केंद्र कार्यान्वित असून सध्याच्या मैलाशुध्दीकरण केंद्र प्रकल्पाची क्षमता वाढविण्याकामी एकूण २.५० हेक्टर जागा लागणार आहे. त्यामुळे "उद्यान" या आरक्षणाचे प्रयोजनात "मैलाशुध्दीकरण" व "उद्यान" असा फेरबदल करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास मान्यता प्रदान केली आहे. (यापुढे "उक्त ठराव" म्हणून संबोधित केलेला)

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उक्त विकास योजनेतील उक्त जमीनीमधील आ.क्र. ३७४ "उद्यान" या आरक्षणांपैकी सुमारे २.५० हेक्टर क्षेत्र "मैलाशुध्दीकरण केंद्र" या प्रयोजनासाठी आरक्षित करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही उक्त ठरावानुसार करण्याचे योजिले आहे. (यापुढे "उक्त फेरबदल" म्हणून उल्लेख केलेला)

आणि त्याअर्थी,उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे - ४११ ०१८ यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला आहे.

उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असतील तर त्या सदरची सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून एक महिन्याचे आत लेखी स्वरुपात आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिपंरी, पुणे - ४११ ०१८ यांचे कार्यालयाकडे पाठवाव्यात.

उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत विहित मूदतीमध्ये पिंपरी चिंचवड महापालिकाकडे प्राप्त झालेल्या हरकती / सूचनांचा विचार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करण्यापुर्वी केला जाईल.

जाहिरात क्रमांक ३२५/१९

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे – ४११ ०१८.

ठिकाणः- पिंपरी
दिनांकः- २३/९/२०१८.

(टिपः- सदर सूचना व फेरबदल दर्शक नकाशा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर ही अवलोकनार्थ उपलब्ध आहे.)

# PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION

## Modification u/s 37 of Maharashtra Regional and Town Planning Act 1966

## Notice

No. TPS/WS/09 /2361 2018

Whereas, the revised Development Plan for Pimpri Chinchwad Municipal Corporation has been sanctioned by the Government of Maharashtra in Urban Development Department, vide Notification No.TPS-1893/1276/C.R.174/93/UD-13, dated 18th September,1995 and which came into force from 2/11/1995. (hereinafter referred to as the "said Development Plan".)

And whereas, in the said Development Plan land bearing S.No. 64 & 65 from village Pimple Nilakh admeasuring about 4.50 Ha has been reserved for "Garden" vide Site No. 374. (hereinafter referred to as the "said Land".)

And whereas, the General Body of Pimpri Chinchwad Municipal Corporation has passed the resolution vide Resolution No.239, dated 20/7/2018 to initiate the modification as per the procedure laid down under section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act 1996, in the said Development Plan to modify the purpose of reservation from "Garden" to "Sewage Treatment Centre" & "Garden". As the present capacity of the existing STP running in some portion of land from 4.00 Ha land in possession of corporation is required to be augmented for which land about 2.50 Ha is required to be reserved for "Sewage Treatment Plant" (hereinafter referred to as the "said Resolution ".)

And whereas, the Municipal Corporation now intends to initiate the modification procedure as laid down under section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 to reserve the land admeasuring about 2.50 Ha. from Site No. 374 of "Garden " for the purpose of "Sewage Treatment Plant" as per the said Resolution, in the said Development Plan ( hereinafter referred to as the "said Modification ".)

And therefore, the copy of the said Modification is kept open for public inspection on all working days during office hours in the office of Deputy Director of Town Planning, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri , Pune - 411 018 .

Any person having any suggestion and / or objection regarding the said Modification may file the same in writing to the Commissioner, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri , Pune – 411 018 within a period of one month from the date of publication of this notice in the gazette of Maharashtra Government.

The suggestions and / or objections received within the stipulated period will be considered by the Municipal Corporation before submitting the proposal to the Government of Maharashtra for sanction.

जाहिरात क्रमांक ३२७।१८

(Shravan Hardikar)
Commissioner ,
Pimpri Chinchwad Municipal Corporation,
Pimpri, Pune-18

Place - Pimpri,
Date- 23 / 10/2018

(Note: The said Notice & plan showing modification proposal is also available on the website of P.C.M.C. – www.pcmcindia.gov.in)